# मुलांची बुद्धी आणि मन यांचा विकास करा !

## अनुक्रमणिका


**प्रकरण १ : बुद्धी** **१०**

१. बुद्धी म्हणजे काय ? मुलाच्या बुद्धीचे मोजमाप कसे करता येईल ? १०

२. बुद्ध्यांक परीक्षेने निश्चित केलेल्या बुद्धीमत्तेच्या निरनिराळ्या पातळ्या कोणत्या ? ११

३. बुद्ध्यांक कसोटीच्या मर्यादा कोणत्या ? ११

४. मुलांचा बुद्ध्यांक समजून घेण्याचे लाभ कोणते ? १२

५. बुद्धीमत्ता कशावर अवलंबून असते ? १२

६. मुलाची बुद्धीमत्ता नि इतर गुण यांवर आहाराचा परिणाम होतो का ? १३

**प्रकरण २ : स्मृती** **१४**

१. स्मृती म्हणजे काय ? १४

२. एखाद्याची स्मृती कशी सुधारावी ? १४

३. मंदबुद्धीची कारणे कोणती ? १५

४. मूल मंदबुद्धीचे होऊ नये; म्हणून कोणती काळजी घ्यावी ? १६

५. मंदबुद्धी असलेल्या मुलाचे भवितव्य सांगता येते का ? १६

६. मंदबुद्धीच्या मुलांची काळजी कशी घ्यावी ? १७

७. विकास मार्गावरील कोणते टप्पे मूल बुद्धीमान होईल, असे दर्शवतात ? १८

८. काही मुले बालवयात सर्वसामान्य बुद्धीमत्तेची असून पुढे सामान्य गुणवत्तेपेक्षा अधिक किंवा अल्प बुद्धीमान का होतात ? १९

९. सध्याची मुले त्यांच्या आईवडिलांपेक्षा अधिक बुद्धीमान आहेत का ? १९

१०. मानवी मेंदूच्या सुप्त शक्ती कोणत्या ? २०

११. एखाद्या व्यक्तीने एकाच क्षेत्रात प्राविण्य का मिळवावे ? २०

१२. गणकयंत्र आणि मेंदू यांतील भेद काय ? २१

**प्रकरण ३ : मन** **२२**

१. मन म्हणजे काय ? २२

२. मनाचे गुणधर्म कोणते ? २६

३. सत्त्व, रज किंवा तम गुण प्राबल्याने असलेल्या मनुष्याचे गुणधर्म कोणते ? २८

४. आदर्श पुरुष कसा ओळखावा ? ३१
५. मनाच्या निरनिराळ्या अवस्था कोणत्या ? ३२
६. मन प्रगल्भ कसे होते ? ३६
७. विचार करणे आणि कारणमीमांसा सांगणे यांच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे कोणते ? ३९
८. भावनांचे कार्य आणि लाभ-हानी कोणत्या ? ४४
९. भावनांच्या विकासातील निरनिराळे टप्पे कोणते ? ४६
१०. सामाजिक विकासाचे टप्पे कोणते ? ४८
११. निरोगी मनाची व्यक्ती कशी ओळखावी ? ४९
१२. मन दुर्बल होण्याची कारणे कोणती ? ५०
१३. मानवी जीवनाचे ध्येय कोणते ? ५१
१४. सद्वर्तनाचे नियम कोणते ? ५२
१५. चांगल्या आणि वाईट गुणांचा व्यक्तीमत्त्वाच्या विकासावर काय परिणाम होतो ? ६२
१६. शरिराची वाढ, मेंदूचा विकास आणि मनाची प्रगल्भता यांचा एकमेकांशी काय संबंध आहे ? ८४

**टीप –** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

## प्रस्तावना

**प्रिय पालक,**

‘आपले मूल गुणी, बुद्धीमान आणि आदर्श व्हावे’, असे तुमचे स्वप्न असेल ना ? हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेमके कोणते प्रयत्न करायला हवेत, हे सांगण्यासाठीच हे ग्रंथपुष्प तुमच्या हाती ठेवत आहे. या विषयावरील पहिल्या ग्रंथात मुलांच्या प्रथम ५ वर्षांतील वाढ आणि विकास यांचे टप्पे सविस्तरपणे दिले आहेत. या दुसऱ्या ग्रंथात बुद्धीचे मोजमाप, बुद्धीवर परिणाम करणाऱ्या गोष्टी, बुद्धी आणि स्मरणशक्ती यांची वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे, तसेच मंदबुद्धीची मुले निपजण्याची कारणे, त्यांची काळजी कशी घ्यावी आणि अशी मुले होण्याचे टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याचीही माहिती येथे दिली आहे. मन आणि मेंदू हे वेगवेगळे अवयव आहेत. मनाची कार्ये, विविध अवस्था आणि उत्क्रांती यांची या ग्रंथात सविस्तरपणे चर्चा केलेली आहे.

'मुलांमध्ये आंतरिक सुधारणा झाली, तरच खऱ्या अर्थाने त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होतो', हे सूत्र लक्षात घेऊन ग्रंथात काही आदर्श व्यक्तीमत्त्वे अन् थोर राष्ट्रपुरुष यांच्या जीवनातील प्रसंग दिले आहेत. त्या त्या प्रसंगामुळे मुलांच्या मनावर संबंधित गुणाचे महत्त्व चटकन बिंबेल.

बालपणी झालेल्या सुसंस्कारांमुळे मुलांचे जीवन आदर्श बनते. या ग्रंथातील विविध उदाहरणांतून सदाचार, साधना, गुरुनिष्ठा, राष्ट्रभक्ती, धर्मप्रेम आदींविषयी उत्तम आदर्श मुलांसमोर ठेवण्यात आले आहेत. मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पालकांनी निश्चित वाचावा असाच हा ग्रंथ आहे.

या ग्रंथात दिलेल्या माहितीच्या आधारे कोवळ्या वयातील मुलाच्या मनाची पालकांकडून कर्तव्यदक्षतेने मशागत होवो आणि सुसंस्कारांचे खत पडून वाढणारे मूलरूपी रोपटे गुणी, बुद्धीमान आणि आदर्श बनो, ही ईश्वरचरणी प्रार्थना !

**- लेखक**